# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:30.07.2025** **वार:बुधवार**

---

1. ऑपरेशन सिंदूरसाठी सैन्यदलाला पूर्ण स्वातंत्र्य, जगभरातून कारवाईला पाठिंबा मिळाल्याचं पंतप्रधानांचं लोकसभेत चर्चेला उत्तर
2. मणिपूर राष्ट्रपती राजवट मुदतवाढीवर चर्चा करण्यास संसदीय सल्लागार समितीची मान्यता
3. नागालँडमध्ये दहा पीएमश्री शाळांचे लोकार्पण
4. निसार उपग्रहाचे आज संध्याकाळी प्रक्षेपण, उलट गणती सुरू
5. मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये सात्विक साईराज-चिराग शेट्टी उपांत्य फेरीत आणि
6. हिमाचलमध्ये मान्सून पुन्हा सक्रीय, देशभरात पावसाचा अंदाज

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूर हे देशाच्या एकजुटीचं, सरकारच्या इच्छाशक्तीचं आणि सैन्याच्या सामर्थ्याचं प्रतिक आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत केलं; ऑपरेशन सिंदूरवरील चर्चेला उत्तर देताना ते म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरला जगभरातून पाठिंबाच मिळाला आणि कारवाईला स्थगिती कोणाच्याही दबावाखाली दिली नाही. या कारवाईसाठी सैन्यदलाला पूर्ण स्वातंत्र्य दिलं होतं, असं सांगताना मोदी म्हणाले...

**सेना को कार्यवाही की खुली छूट दे दी गई और यह भी कहा गया कि सेना तय करें, कब, कहां, कैसे, किस प्रकार से? यह सारी बातें उस मीटिंग में साफ-साफ कह दी गई और कुछ बातें उसमें से मीडिया में शायद रिपोर्ट भी हुई हैं। हमें गर्व है, आतंकियों को वह सजा दी और सजा ऐसी है कि आज भी आतंक के उन आकाओं की नींद उड़ी हुई है।**

पाकिस्तानची कुठलीही आगळीक आपण खपवून घेणार नाही, असा सज्जड इशारा पंतप्रधानांनी दिला. तत्पूर्वी, ऑपरेशन सिंदूरची सविस्तर माहिती देतांना गृहमंत्री अमित शहा यांनी सैन्यदलावर अविश्वास दाखवल्याबद्दल विरोधकांवर जोरदार टीका केली. भारताच्या सशस्त्र दलांनी एकीकडे ऑपरेशन सिंदूरद्वारे दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्यांना जमीनदोस्त केलं, तर दुसरीकडे पहलगाममध्ये निरपराध पर्यटकांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना लष्कर आणि सशस्त्र दलांनी ऑपरेशन महादेवद्वारे संपवलं, असं अमित शहा यांनी लोकसभेत सांगितलं. ठार केलेले तीन दहशतवादी लष्कर ए तैयबाचे कमांडर होते आणि ते पहलगाम हल्ल्यात सामील असल्याचे ठोस पुरावे तपास यंत्रणांकडे असल्याचा दावा शहा यांनी केला.

पाकिस्तानच्या लष्करी तळावर हल्ला करू नका असं सांगून सरकारनं राजकीय इच्छाशक्तिचा अभाव दाखवला, अशी टीका लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या चर्चेदरम्यान केली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर आपण कायम सरकारबरोबरच होतो, मात्र कारवाईला स्थगिती देऊन सरकार इतर देशांच्या दबावाला बळी पडल्याची टीका त्यांनी सरकारवर केली. कॉंग्रेसच्या प्रियांका गांधी, समाजवादी पार्टीच्या अखिलेश यादव यांच्यासह विविध खासदारांनी या चर्चेत भाग घेतला. राज्यसभेतही काल ऑपरेशन सिंदूरवरच्या चर्चेला सुरुवात झाली, ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतानं दहशतवाद्यांबद्दलचं कठोर धोरण जगाला दाखवून दिल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी राज्यसभेत सांगितलं. पहलगाम हल्ला सुरक्षा व्यवस्थेतल्या त्रुटीमुळे झाला, याची जबाबदारी केंद्रीय गृहमंत्र्यांनी घ्यायला हवी, अशी टीका राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.

**मणिपूर राष्ट्रपती**

मणिपूरमध्ये गेल्या वर्षी झालेल्या वांशिक हिंसाचारानंतर 13 ऑगस्टपासून लागू करण्यात आलेल्या राष्ट्रपती राजवटीला आणखी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्याच्या मुद्द्यावर चर्चेसाठी  दोन तासाचा वेळ देण्यास संसदीय सल्लागार समितीने काल मान्यता दिली. राज्यसभेचे उपसभापति हरिवंश यांनी काल राज्यसभेत ही घोषणा केली. गृहमंत्री अमित शहा चालू अधिवेशनात या संदर्भात वैधानिक ठराव मांडतील.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून पश्चिम बंगाल आणि झारखंडच्या तीन दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. पश्चिम बंगालच्या दौऱ्यात, राष्ट्रपती पश्चिम बंगालमधल्या कल्याणी इथं अखिल भारतीय वैद्यकीय संस्थेच्या पहिल्या दीक्षांत समारंभात सहभागी होणार आहेत. त्यानंतर झारखंडमधल्या देवघरमध्ये, एम्स च्या पहिल्या दीक्षांत समारंभाला त्या उपस्थित राहणार आहेत. धनबादमधल्या भारतीय खाण विद्यालय आयआयटीच्या, 45 व्या समारंभातही राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. भारतीय खाण विद्यालयाला 2016 मध्ये अखिल भारतीय तंत्रज्ञान संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे.

**नागालँड पीएमश्री शाळा**

नागालँडमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त, काल दहा पीएम श्री शाळांचे लोकार्पण तसंच 23 वसतिगृहांचे पायाभरणी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून करण्यात आले. यामध्ये चुमोकेडिमा, किफीरे, मायगनोक्चा आणि थांगजाम इथल्या सरकारी शाळा, किरूपेमा, डीसी कॉलनी, पेरेन टाऊन, फुसाचोडू, वोखा व्हिलेज, न्येंगचिंग आणि मॉन टाऊन ए मधील सरकारी माध्यमिक शाळ यांचा समावेश आहे. देशातल्या एकंदर साडेचौदा हजार शाळा या उपक्रमाचा भाग आहेत. तर 23 वसतिगृहं धरती आबा लोकभागीदारी अभियानाचा भाग आहेत.

**महापोलिस शौर्यपदक**

मुंबईत काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते महाराष्ट्रातल्या 64 पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पोलिस शौर्य पदके प्रदान करण्यात आली. त्यामध्ये चार अधिकाऱ्यांना विशिष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदक प्रदान करण्यात आले तर 38 अधिकारी, कर्मचारी यांना उत्कृष्ट सेवा पोलीस पदकाने सन्मानित करण्यात आले.

राजभवन इथे झालेल्या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहराज्यमंत्री योगेश कदम, पोलिस महासंचालक रश्मी शुक्लांसह पोलिस कुटुंबीय हजर होते.

**निसार प्रक्षेपण**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजे इस्रो आणि अमेरिकेच्या नासा यांचा संयुक्त उपक्रम असलेला नासा-इस्रो सिंथेटीक अपर्चर रडार म्हणजे निसार या उपग्रहाचं आज सायंकाळी श्रीहरिकोटा इथल्या सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपण होणार आहे. काल दुपारी दोन नंतर त्याची उलट मोजणी सुरू झाली आहे. या उपग्रहाच्या माध्यमातून दर बारा दिवसांनी संपूर्ण पृथ्वीचे निरीक्षण करण्यात येणार असून, हवामान बदल संशोधन आणि आपत्ती प्रतिसादासाठी उच्च प्रतीच्या प्रतिमा मिळणार आहेत. सेंटीमीटर पातळीवरील अचूकतेसह पृथ्वीच्या पृष्ठभागावरील बदलांचा मागोवा घेण्यासाठी यामध्ये नासाचे एल-बँड आणि इस्रोचे एस-बँड रडार आहेत.

**इटली वाल्मिकी**

इटलीतील कॅम्पोरोटोन्डो शहरामध्ये रामायण महाकाव्य लिहिणाऱ्या महर्षि वाल्मिकी यांच्या पुतळ्याचे अनावरण भारतीय राजदूत वाणी राव आणि शहराचे महापौर मॅसिमिलियानो मिकुची यांच्या हस्ते करण्यात आलं. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या रामायणाच्या माध्यमातून जगाला जोडणे उपक्रमांतर्गत हा पुतळा भारताने प्रचाराचा एक भाग म्हणून भेट दिला आहे. वसुधैव कुटुंबकम् या तत्वाधारित सांस्कृतिक निर्मितीला प्रोत्साहन देणे ही या उपक्रमाचं उद्दीष्ट्यं आहे.

**रशिया-युक्रेन हल्ला**

आग्नेय युक्रेनमधील तुरूंगावर रशियाने केलेल्या हवाई हल्ल्यात किमान 16 जण ठार तर 30 लोक जखमी झाले आहे. युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, झापोरिझ्झियामध्ये सोमवारी रात्री झालेल्या हल्ल्यात आसपासच्या नागरी घरांचेही नुकसान झाले. दरम्यान दक्षिण रशियामध्ये युक्रेनने केलेल्या ड्रोन हल्ल्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

**भूकंप**

रशियाच्या कामचात्का द्विपकल्पाच्या किनारपट्टीवर 8 पूर्णांक 8 रिख्टर क्षमतेचा भूकंपाचा धक्का बसला आहे. अलिकडच्या वर्षातील हा सर्वात शक्तिशाली भूकंप नोंदवला गेला असून त्याच्यामुळं त्सुनामी येण्याचा इशारा देण्यात आला आहे. जपानच्या उत्तर किनारपट्टीवर त्सुनामीच्या लाटा धडकल्याचं वृत्त असून त्यांची उंची वाढण्याची शक्यता आहे. हवाईमध्ये होनोलुलुसह काही भागातील लोकांना तत्काळ दूर नेण्यात येत आहे. अधिक तपशिलाची प्रतीक्षा आहे.

**मेघनाद देसाई**

भारतीय वंशाचे प्रख्यात अर्थशास्त्रज्ञ आणि ब्रिटनच्या हाऊस ऑफ लॉर्डस्चे सदस्य मेघनाद देसाई यांचं काल निधन झाले. ते 85 वर्षांचे होते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये ते प्रोफेसर एमिरेटस् होते त्यांनी 1965 ते 2003

या काळात अध्यापन केले होते. गुजरातमध्ये जन्म झालेले देसाई जागतिक स्तरावर प्रतिष्ठित भारतीय-ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ, शैक्षणिक आणि राजकीय विचारवंत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देसाईंना श्रद्धांजली वाहिली आहे.

**बॅडमिंटन**

मकाऊ खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये भारताने विविध श्रेणींमध्ये उत्कृष्ट कामगिरीसह दमदार सुरुवात केली. पुरुष दुहेरीत सत्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टीने मलेशियाच्या लो हंग यी आणि एनग चियॉंगवर सरळ सेटमध्ये मात करत दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.महिला एकेरीमध्ये, अनमोल खरब आणि तस्नीम मीर यांनी त्यांच्या पात्रता फेरीमध्ये विजय मिळवून मुख्य ड्रॉमध्ये प्रवेश केला. अनमोलने अझरबैजानच्या तर तस्नीमने थायलंडच्या प्रतिस्पर्ध्यांचा पराभव केला. पुरुष दुहेरीच्या पात्रता फेरीत, डिंकु सिंग कोंथुजाम आणि मान मोहम्मद यांनी हाँगकाँगच्या जोडीवर विजय मिळवून मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळवले. मिश्र दुहेरीमध्येही यश मिळवत भारताच्या थंडरंगिनी हेमा नागेन्द्र बाबू आणि प्रिया कोनजेंगबाम यांनी मुख्य फेरीत प्रवेश केला आहे.

**हिमाचल मान्सून**

हिमाचल प्रदेशात पुन्हा एकदा मान्सून सक्रीय झाला आहे. शिमला, मंडी, कांगडा, बिलासपूर, उना आणि हमीरपूरसह अनेक जिल्ह्यातून मुसळधार पावसाचे वृत्त आहे. त्यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. भूस्खलनामुळे राज्यातले 259 रस्ते बंद झाले आहेत. येत्या 24 तासांत चार जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसासाठी हवामान खात्याने केशरी बावटा दिला आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने बिहार, पूर्व राजस्थान, हिमाचल प्रदेश आणि पश्चिम उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. तर महाराष्ट्रासह उर्वरीत देशातही मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, मच्छिमारांना 3 ऑगस्टपर्यंत अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात न जाण्याचा सल्ला हवामान विभागाने दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.